2 9 SEP 2021
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यापीठाच्या वतीने स्मृती उद्यान परिसरात आयोजित स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले ज्येष्ठ नागरिक.

# विद्यापीठात ज्येष्ठांनी राबवली स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परिसरात प्रभात संचार मंचाच्या ज्येष्ठनागरिकांनी स्वच्छता केली. या वयातही स्वच्छतेच्या कामात सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व प्रभात संचार मंच यांच्या सयुंक्त विद्यमाने आझादी की ७५ वर्षे या उपक्रमांतर्गत स्मृती उद्यान परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या आझादी की ७५ वर्षे या उपक्रमाला ज्येष्ठांनी प्रतिसाद देऊन स्वच्छता मोहिमेत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

विद्यापीठाच्या गेट क्र. ८ च्या परिसरातील स्मृती उद्यान परिसर व परीक्षा विभागाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा स्वच्छता केली. आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात ज्येष्ठ नागरिकांनी स्वच्छतेचे काम केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्र. संचालक प्रा. ए. एम. गुरव, अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव, संतोष राठोड, प्रभात संचार मंडळाचे श्रीकांत अडिवरेकर उपस्थित होते. अतुल एतावडेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ३३६ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी बी.ए., बी.एस्सी. अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर ३३६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च- एप्रिलच्या परीक्षांतर्गत मंगळवारी बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या पुनर्परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. ९ हजार ४३९ पैकी ८ हजार ६१४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

तरूण भारत

# सर्वसमावेशक दृष्टीकोनातून पर्यटनाच्या विकासाची गरज

- शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागप्रमुख डॉ.मीना पोतदार यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

पर्यटनाच्या माध्यमातून ऐतिहासिक, सांस्कृतिक पर्यावरणीय सौंदर्य जपले पाहिजे. शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीकोनातून पर्यटनाचा विकास होणे महत्वाचा आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. मीना पोतदार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, निरंतर शिक्षणाच्या माध्यमातून 'ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम' अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक पर्यटन दिन' यानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'पर्यटन सर्वसमावेशक विकास' या विषयावर त्या बोलत होत्या.

शहाजी कॉलेजमधील डॉ. धनाजी काशीद–पाटील, वाई येथील किसन वीर महाविद्यालयातील डॉ. भिमाशंकर बिराजदार, ऐतवडे–खुर्द येथील वारणा महाविद्यालयातील डॉ. सुरेश इंगळे, गडहिंग्लज येथील ज्ञानप्रबोधनमधील डॉ. रेखा पोतदार यानीं मार्गदर्शन केले. चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाचे प्रा. पी. आर. माळी यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डी. के. पाटील, आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम या अभ्यासक्रमांतर्गत करिअरच्या संधी याविषयी माहिती दिली. प्रस्ताविक डॉ. सुमन बुवा यांनी केले. यशोधन बोकिल यांनी आभार मानले.

तरूण भारत

# म. गांधी जयंती पूर्वसंध्येला दोन संदर्भग्रंथांचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ प्रा. चंद्रकांत लंगरे, प्रा. टेरी बेट्झल संपादीत ग्रंथ

व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेट्झल आणि शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी संपादीत केलेल्या महात्मा गांधी यांच्या जीवनाविषयीच्या दोन संपादित आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. हा सोहळा १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता ऑनलाईन होणार आहे. इंग्लंड पार्लमेंटमधील मजूर पक्षाचे सदस्य ज्येष्ठ विचारवंत प्रा. लॉर्ड भिकू पारेख आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

प्रा. बेट्झल आणि प्रा. लंगरे यांनी 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी: द ग्लोबल परस्पेक्टीव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी: द ग्लोबल अप्रायझल' हे दोन संदर्भग्रंथ संपादित केले आहेत. गांधी यांची १५० वी जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचे औचित्य साधून जेम्स मॅडिसन विद्यापीठाचे महात्मा गांधी सेंटर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या विद्यमाने हा प्रकाशन सोहळा आयोजित केला आहे.

तरूण भारत

# ज्येष्ठ विचारवंत तुषार गांधी यांचे शनिवारी ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवार २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांची जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी यांचे पणतू, ज्येष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे. 'भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आणि महात्मा गांधी' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. शनिवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' https://www.youtube.com/c/ShivVarta या वाहिनीवरून गांधी यांचे व्याख्यान प्रसारित करण्यात येईल. तरी सर्व शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठातील एलएलबीचा निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एलएलबीच्या सात महाविद्यालयांची परीक्षा क्लस्टर पध्दतीने करण्यात आली आहे. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. ८० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे. त्याचबरोबर बी. कॉम. आय. टी., एम. बी. ए., एम. एस्सी. टेक., एम. एस्सी. फिजिक्स यासह आतापर्यंत ३२६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

## विद्यापीठ पुनर्परीक्षा सुरळीत

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या पुनर्परीक्षा सोमवारी सुरळीत पार पडली. बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., या विषयांचा समावेश आहे. ३६३ विद्यार्थ्यांपैकी २३२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी दूर करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी, सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत आहे. तरी विद्यार्थ्यांनी अडचण आल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.